


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २९८ • बुधवार दि.२६ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## तिबेटमधून आलेल्या महापुराने नेपाळ हादरले

### एक हजार नागरिक वाहून गेल्याची भीती;१०५ भारतीय नागरिक बेपत्ता




नवी दिल्ली:तिबेटमधून अचानक आलेल्या महापुराने नेपाळमध्ये खळबळ उडाली असून, रासुवा भागाला पुराचा मोठा फटका बसला आहे. भोटेकोशी नदीत अचानक मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याने अनेक भाग जलमय झाले आहेत. या पुरामागे तिबेटमधील हिमनदीचे सरोवर फुटल्याचा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात येत आहे. या आपत्तीत तब्बल एक हजार नागरिक वाहून गेल्याची भीती व्यक्त होत असून, तिबेट सीमेलगतची काही गावे पुराच्या प्रवाहात वाहून गेल्याचे वृत्त आहे.

या पुरामुळे ३२ नेपाळ पोलीस आणि ९ सशस्त्र पोलीस कर्मचाऱ्यांसह एकूण ४१ सुरक्षा कर्मचारी बेपत्ता झाल्याचे वृत्त आहे. तर रसुवामधील या पुरामुळे ३८४ देशी आणि विदेशी पर्यटक (एनटीबी) ट्रॅव्हल एजन्सी, स्थानिक संस्था, टूर गाईड आणि सुरक्षा यंत्रणांकडून खात्री केल्यानंतर ही अधिकृत आकडेवारी जाहीर केलीय. बेपत्ता लोकांच्या शोधण्यासाठी युद्धपातळीवरील बचाव मोहीम सुरू करण्यात घेऊन नेपाळ प्रशासनाने नदीकाठच्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होण्याचे आवाहन केले आहे.रासुवा परिसरातील पुराचा परिणाम पुढील भागांवर होण्याची शक्यता लक्षात घेऊन पान ४ वर

#### पंतप्रधानांकडून तातडीची बैठक

रासुवा भागातील भीषण पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांनी राष्ट्रीय सुरक्षा परिषदेची तातडीची बैठक बोलावली आहे. बुधवारी सकाळी रासुवा परिसराला पुराचा मोठा फटका बसला. या बैठकीत आपत्तीची तीव्रता, सुरू असलेले बचावकार्य, नागरिकांची सुरक्षितता आणि पुढील उपाययोजनांचा आढावा घेतला जाणार आहे.

## प्रलंबित देयकांच्या तणावातून कंत्राटदार गजानन देवकते यांची आत्महत्या



मुखेड/प्रतिनिधी- सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ठेकेदारांची देयके दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने आर्थिक अडचणी वाढत आहेत. या परिस्थितीला कंटाळून मुखेड येथील तरुण ठेकेदार गजानन देवकत्ते यांनी मंगळवारी मुंबई येथे आत्महत्या केल्याची घटना घडली, आज मुखेड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

गजानन देवकते यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील अनेक कामांची देयके थकीत होती. वारंवार पाठपुरावा करूनही देयके मिळत नसल्याने त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला होता. या तणावातून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या कथित चिठ्ठीत दोन अधिकाऱ्यांची नावे असल्याची चर्चा आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी मागणी होत आहे.दरम्यान, ठेकेदारांची कोट्यवधी रुपयांची देयके प्रलंबित असल्याने या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. देयके वेळेत मिळाल्यास ठेकेदारांना पान ४ वर

## एमपीएससीच्या औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणी सहा जणांना अटक

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अन्न व औषध प्रशासन विभागातील ड्रग इन्स्पेक्टर, गट-ब पदांची संपूर्ण भरती प्रक्रिया पेपरफुटीच्या आरोपांमुळे रद्द करण्यात आली आहे. २२ मार्च २०२६ रोजी झालेल्या चाळणी परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका काही उमेदवारांपर्यंत पोहोचल्याचे मुंबई गुन्हे शाखेच्या प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्यानंतर आयोगाने हा कठोर निर्णय घेतला. दरम्यान, या पेपरफुटीप्रकरणी एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांसह सहा जणांना अटक करण्यात आली असून, आरोपींना २ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

ड्रग इन्स्पेक्टर पदासाठी २२ मार्च रोजी राज्यातील सहा विभागीय मुख्यालयांवर ऑफलाइन पद्धतीने चाळणी परीक्षा घेण्यात आली होती. १२ जून रोजी निकाल जाहीर झाल्यानंतर ५०६ उमेदवारांना मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यात आले. त्यापैकी ४८८ उमेदवारांच्या १ ते २२ जुलै दरम्यान मुलाखती घेण्यात आल्या, तर ४८५ उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादीही जाहीर करण्यात आली होती. मात्र, परीक्षा झाल्यानंतर काही उमेदवार आणि लोकप्रतिनिधींनी परीक्षा सुरू होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका लीक होऊन सोशल मीडियावर प्रसारित झाल्याच्या तक्रारी आयोगाकडे केल्या. तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेऊन एमपीएससीने २७ जुलै रोजी मुंबई पोलिसांकडे अधिकृत तक्रार दाखल केली. त्यानंतर गुन्हे शाखेने तपास सुरू केला. प्राथमिक तपासात परीक्षा होण्यापूर्वीच किमान एका उमेदवाराच्या हाती प्रश्नपत्रिका लागल्याचे आणि त्याला त्याचा फायदा झाल्याचे समोर आले. त्यामुळे परीक्षेची विश्वासार्हता आणि पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. अखेर पान ४ वर



नांदेड येथे मुस्लिम बांधवांच्या पवित्र जुलूस-ए-मोहम्मदी (ईद) ईद-ए-मिलाद निमित्त नबी मार्ग श्रीनगर, आयटीआय, शिवाजीनगर, कलामंदीर, वजिराबाद, महावीर चौक, जुना मोंढा अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीचा समारोप मिलाद मैदान मोहम्मदअली रोड येथे करण्यात आला. (छाया : मुनवरखान)

## कर्णकर्कश आवाज करणाऱ्या सात वाहन चालकांवर कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील खुदबेनगर चौकात वाहनांचे सायलेन्सर मोडीफाय बसवून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या सात वाहन चालकांवर नांदेड ग्रामीण पोलीसांकडून आज (बुधवार) कारवाई करण्यात आली आहे.

जुन्या नांदेड शहरातील खेदबेनगर चौरस्ता येथे काही वाहन चालक कर्णकर्कश आवाज करीत वाहन सुसाट वेगाने चालवित होते. पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्या आदेशावरुन नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस कर्मचाऱ्यांनी बुधवारी सकाळी दुचाकीस्वार वाहनांची तपासणी सुरु केली. सायलेन्सर मोडीफाय बसवून कर्णकर्कश आवाज करणारे सात वाहने पोलीसांनी जप्त केली. सदरील वाहन चालकांविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## नेपाळमध्ये अडकलेल्या नांदेड जिल्ह्यातील पर्यटकांनी आपत्कालीन कार्य केंद्राशी संपर्क साधावा-जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर विविध देशांतील पर्यटक व नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातील जे पर्यटक सध्या नेपाळमध्ये असून पूरस्थितीमुळे अडकले आहेत किंवा ज्यांचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क होत नाही, त्यांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी तात्काळ जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासना मार्फत करण्यात आले आहे. यासाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधता येईल : जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, नांदेड ०२४६२-२३५०७७, १०७७ (टोल फ्री) नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांची माहिती प्रशासनाला देताना संबंधित व्यक्तीचे नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण/हॉटेल, प्रवासाचा तपशील आणि कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक उपलब्ध असल्यास तो द्यावा. नांदेड जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून न जाता अधिकृत माहितीसाठी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. आपत्तीग्रस्त भागातील नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती माहिती व समन्वय साधण्याचे प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहेत.

## पावसाचा खंड:देगलूरच्या बाजारपेठेतील ७५ टक्के उलाढालीवर परिणाम

### शेतकरी आकाशाकडे,व्यापारी ग्राहकांच्या प्रतीक्षेत

देगलूर/प्रतिनिधी-खरीप हंगामातील पिके वाढीच्या निर्णायक टप्प्यात असतानाच ऑगस्ट महिन्यात पावसाने मोठा खंड दिल्याने देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. कापूस, सोयाबीन, तूर, हळद आदी पिके सध्या तग धरून असली तरी कडक उन्हामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. पुढील चार-पाच दिवसांत दमदार पाऊस न झाल्यास पिके करपण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. पावसाच्या या दडीचा थेट परिणाम देगलूर शहराच्या बाजारपेठेवरही झाला असून आर्थिक उलाढाल तब्बल ७५ टक्क्यांनी मंदावल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

देगलूर तालुक्यात सिंचनाच्या सुविधा अपुऱ्या असल्याने खरीप हंगामातील पिकांवरच शेतकऱ्यांची मोठी मदार आहे. यंदा मान्सूनचे आगमन उशिरा झाल्याने खरीप पिकांची पेरणी जुलै महिन्यात झाली. त्यानंतर अधूनमधून झालेल्या मध्यम स्वरूपाच्या पावसामुळे पिकांना काहीसा आधार मिळाला. मात्र, ३१ जुलै रोजी झालेल्या पावसानंतर ऑगस्टमध्ये अद्याप अपेक्षित दमदार पाऊस झालेला नाही. त्या पावसाच्या ओलाव्यावर पिके तग धरून आहेत. त्यातच दिवसा वाढणारे कडक ऊन आणि जमिनीतील घटता ओलावा यामुळे पिकांची अवस्था नाजूक बनली आहे. शेतकऱ्यांच्या अडचणीचे पडसाद आता देगलूरच्या बाजारपेठेत उमटू लागले आहेत. शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये ग्राहकांची वर्दळ लक्षणीयरीत्या कमी झाली असून अनेक दुकानांमध्ये दिवसभर शुकशुकाट दिसून येत आहे. शेतीच्या उत्पन्नावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल मंदावली आहे. पोळा, गणेशोत्सव, महालक्ष्मी आदी सण जवळ आले असतानाही बाजारपेठेत अपेक्षित उत्साह दिसत नसल्याने व्यापारी चिंतेत आहेत. अनेक व्यापाऱ्यांना दिवसभर दुकानात बसूनही रोजचा खर्च भागविणे कठीण झाले आहे. पाऊस नसल्याने शेतकऱ्यांकडे पैसा फिरत नसल्याचा थेट परिणाम किरकोळ आणि घाऊक व्यापारावर झाला आहे. अत्यावश्यक वस्तूंची खरेदी वगळता इतर वस्तूंच्या खरेदीकडे ग्राहकांनी पाठ फिरविल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. खरीप पिकांसाठी शेतकऱ्यांनी बियाणे, रासायनिक खते, फवारणी, खुरपणी आदींवर मोठा खर्च केला आहे. मात्र जून महिन्यापासून अपेक्षेप्रमाणे दमदार पाऊस न झाल्याने जमिनीतील पाणीपातळीत वाढ झालेली नाही. विहिरी आणि बोअरवेलमध्येही जेमतेम पाणी उपलब्ध असल्याने काही शेतकरी उपलब्ध पाण्याच्या आधारे पिके वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र, सर्व क्षेत्राला पाणी देणे शक्य नसल्याने आकाशाकडे डोळे लावून बसण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

#### रोजचा खर्च निघणेही अवघड

पाऊस नसल्यामुळे ग्राहक बाजारपेठेत येत नाहीत. अत्यंत गरजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठीच ग्राहक दुकानात येत आहेत. त्यामुळे बाजारपेठेत चिंतेचे वातावरण आहे. रोजचा दुकान खर्च निघणेही सध्या अवघड झाले आहे.

**-विजय अनुप कोडगिर,**
अध्यक्ष,कापड असोसिएशन,देगलूर

#### अपेक्षेच्या केवळ २५ टक्के खरेदी

जीवनावश्यक वस्तूंचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. त्यातच पाऊस नसल्याने शेतकरी आणि व्यापारी दोघेही अडचणीत सापडले आहेत. श्रावण महिन्यात किराणा वस्तूंची विक्री वाढते; मात्र यंदा दरवाढ आणि पावसाच्या अभावामुळे अपेक्षेच्या केवळ २५ टक्केच खरेदी होत आहे.

**-दिलीप बच्चेवार,**
किराणा व्यापारी, देगलूर

# शिक्षणाला वयाची शिक्षा कशासाठी?

**आदिवासी विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी लागू करण्यात आलेली ३० वर्षांची वयोमर्यादा अखेर राज्य सरकारने रद्द केली आहे. १३ दिवसांच्या आंदोलनानंतर सरकारने १४ ऑगस्टचा शासन निर्णय आणि त्याअंतर्गत करण्यात आलेली सुधारित नियमावली मागे घेतली. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मिळालेले यश म्हणून पाहता येईल; मात्र त्यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी असलेल्या वसतिगृहाला वयाची मर्यादा घालण्याची गरजच का निर्माण झाली? आदिवासी समाजातील अनेक विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा प्रवास इतर विद्यार्थ्यांपेक्षा वेगळा असतो. दुर्गम भाग, वाहतुकीचा अभाव, आर्थिक अडचणी, कुटुंबाची परिस्थिती आणि शिक्षणाच्या मर्यादित सुविधा यामुळे अनेकांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी अधिक वेळ लागतो. त्यामुळे एखादा विद्यार्थी २५, २८ किंवा ३० वर्षांचा झाला म्हणून त्याची शिक्षणाची गरज संपत नाही. उलट, अशा विद्यार्थ्याला शिक्षण पूर्ण करण्यासाठी आधार देणे हीच सामाजिक न्यायाची खरी कसोटी आहे.वसतिगृह हे केवळ चार भिंतींचे निवासस्थान नाही. ते ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली ठेवणारे साधन आहे. घरापासून दूर राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला सुरक्षित निवास, भोजन आणि शैक्षणिक वातावरण मिळणे आवश्यक असते. ज्याला या सुविधेची सर्वाधिक गरज आहे, त्याच विद्यार्थ्याला केवळ वयाच्या आकड्यामुळे बाहेर ठेवणे हे कल्याणकारी राज्याच्या भूमिकेशी विसंगत ठरते.या प्रकरणात आणखी एक गंभीर बाब समोर आली. वसतिगृहांच्या नियमांमध्ये बदल करण्यापूर्वी संबंधित विद्यार्थ्यांशी पुरेसा संवाद झाला का, हा प्रश्न आहे. नवीन नियमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आणि राज्यभर आंदोलन उभे राहिले. पुण्यातील आंदोलन १३ व्या दिवशी पोहोचल्यानंतर सरकारला निर्णय मागे घ्यावा लागला. धोरणनिर्मिती करताना ज्यांच्यासाठी धोरण केले जाते, त्यांचा आवाज आधी ऐकला असता तर आंदोलनाची वेळच आली नसती. सरकारने वयोमर्यादा रद्द करून योग्य पाऊल उचलले आहे. मात्र आता केवळ निर्णय मागे घेऊन प्रश्न संपणार नाही. आदिवासी वसतिगृहांची क्षमता, भोजनाची गुणवत्ता, स्वच्छता, सुरक्षितता, शैक्षणिक वातावरण, आरोग्य सुविधा आणि प्रशासन यांचा सर्वंकष आढावा घेणे गरजेचे आहे. सरकारने विद्यार्थी-केंद्रित व्यवस्था उभी करण्याचे संकेत दिले आहेत. त्याची अंमलबजावणी कागदावर न राहता प्रत्यक्ष वसतिगृहांमध्ये दिसली पाहिजे.सामाजिक न्याय म्हणजे एखाद्या समाजाला केवळ सवलत देणे नव्हे; तर ज्यांच्या वाट्याला ऐतिहासिकदृष्ट्या कमी संधी आल्या, त्यांना त्या संधीपर्यंत पोहोचण्याचा समान मार्ग उपलब्ध करून देणे होय. आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा देणे ही दया नाही, तर त्यांच्या शिक्षणाच्या अधिकाराला बळ देण्याची जबाबदारी आहे. म्हणूनच सरकारने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत करताना पुढचा प्रश्न विचारला पाहिजे. आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी संघर्ष करावा लागणार नाही, अशी व्यवस्था आपण कधी उभी करणार? वयाची अट हटविणे हा त्या दिशेने एक टप्पा आहे. पण खरा विजय तेव्हाच मानता येईल, जेव्हा एखाद्या आदिवासी विद्यार्थ्याला आपल्या शिक्षणाच्या अधिकारासाठी रस्त्यावर उतरावे लागणार नाही.शिक्षणाची दारे उघडण्यासाठी शासन असते; दारे बंद करण्यासाठी नव्हे. आणि शिक्षणाला वयाची शिक्षा देणे, कोणत्याही परिस्थितीत, सामाजिक न्याय ठरू शकत नाही.**

# सरकारी शाळांच्या गळपेचीमुळे गरीबांचे वांदे



सरकारी मराठी शाळा बंद होत असल्याची चर्चा मागील २० वर्षांपासून चर्चेत आहे. मराठी शाळांमध्ये त्यातही खासगी मराठी शाळाही सेमी इंग्रजीत बदलल्या आहेत. मराठी शाळा बंद होत असताना महापालिका, जिल्हा परिषदांच्या शाळांचीही स्थिती कठीण आहे. मराठी शाळा त्यातही सरकारी शाळा या केवळ रोजंदारीवर काम करणारे कामगार, मजूर, हातावर पोट असलेल्या दारिद्र्य रेषेखालील पालकांच्या पाल्यांसाठी असल्याचे चित्र आहे. शाळा बंद पडत चालल्याने गरीबांच्या मुलांच्या शिक्षणांचे वांदे होत असून त्यांची मुले शालाबाह्य होत आहेत.

महाराष्ट्र राज्यात आजही ग्रामीण भागात अंगणवाड्या आहेत. तर सरकारी शाळांमध्ये अल्पभूधारक शेतकरी, विटभट्टी कामगार, उसतोडणी कामगारांची मुले शिक्षण घेत आहेत. व्यवहारी जगात आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी इंग्रजीचे ज्ञान आवश्यक आहे यात दुमत नाही, त्यासाठी मराठी शाळा बंद करण्याचा उफराटा मार्ग अवलंबला जात आहे. हा प्रश्न राजकीय नसून सामाजिक आहे. परंतु यातील जाणीवपूर्वक केले जाणारे राजकारण जास्त गंभीर आहे. राजकारण्यांच्या अमीर उमरावांच्या मालकीच्या खासगी संस्था टिकवण्यासाठी मराठी आणि सरकारी शाळांचा बळी दिला जात आहे. कित्येक शाळांचा बळी देऊन त्या जमिनी व्यावसायिक हेतूने ताब्यातही घेतल्या आहेत. मराठी आणि सरकारी शाळा बंद करण्यामागे सुनियोजित अशी व्यवस्था केली जात आहे. प्रशासकीय अडचणी, कारणे दाखवून शाळा बंद करण्यासाठीच प्रयत्न होत आहेत. मराठी आणि सरकारी शाळांना जगवण्यापेक्षा त्या बंद कशा केल्या जातील यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मराठी शाळांप्रती असलेली ही उदासीनता गोरगरीब विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलणारी आहे. राज्यात आजही मोठा समूह आर्थिक विवंचनेत आणि गरीबीच्या खाईत खितपत पडलेला असताना सरकारी शाळांकडे जाणारा मार्गच या खाईतून बाहेर पडण्याचा मार्ग आहे.

गरीबांच्या मुलामुलींना मूलभूत असे शालेय शिक्षणच नाकारले जात असल्याने त्यापुढील शिक्षणाचा विषयच निकालात निघत आहे. परिणामी उच्च शिक्षण, कौशल्यपूर्ण शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, वैद्यकीय किंवा तंत्रशिक्षणाचे मार्ग सुरू होण्याआधीच संपवले जात आहेत. लोकशाही स्वीकारलेल्या राज्यव्यवस्थेत सरकार ही सर्वोच्च संस्था मानली जाते. अशी सरकारी ताकद पाठीशी असतानाही सरकारी शाळा, सरकारी रुग्णालये, सरकारी संस्थांना जाणीवपूर्वक कमकुवत ठेवण्यात आल्याचा आपला इतिहासही खूप जुना झाला आहे.

पालकच आपल्या पाल्यांना खासगी संस्थांमध्ये पाठवतात, त्यामुळे सरकारी शाळा बंद होत असल्याचा कांगावा चुकीचा आहे. सरकारी संस्थांमधील शैक्षणिक दर्जा मागील पाच दशकात आपल्याला राखता आला असता तर आज या संस्था बंद करण्याची नामुष्की ओढावली नसती. सरकारी शिक्षण संस्था ज्या जागेवर उभारल्या गेल्या आहेत, तिथला भूखंड गिळण्यासाठी शाळा जाणीवपूर्वक बंद केल्या जात आहेत. यात राजकारणी, भूखंड व्यावसायिक, बडे भांडवलदार यांचे संगनमत असल्याचे अनेकदा सिद्ध झाले आहे. या संगनमताला सरकारी, प्रशासकीय आशीर्वादही वेळोवेळी मिळाल्याचे स्पष्ट होते. सरकारी शाळा हा या देशाच्या शिक्षण व्यवस्थेचा कणा मानला जातो, कारण खासगी शाळांच्या तुलनेत ती केवळ इमारत नसून संविधानाने दिलेल्या समानतेच्या आश्वासनाचे मूर्त रूप आहे, पण आज याच कण्याला गंभीर कीड लागली आहे आणि ही कीड केवळ भिंतींना लागलेली नाही तर व्यवस्थेच्या मुळापर्यंत पोहोचली आहे, याचे सगळ्यात विदारक चित्र ग्रामीण आणि निमशहरी भागात दिसते जिथे सरकारी शाळा अजूनही लाखो गरीब, आदिवासी, दलित आणि शेतमजूर कुटुंबांच्या मुलांसाठी शिक्षणाचा एकमेव आधार आहे, पण त्या आधाराचा पाया आता डळमळीत झाला आहे.

पहिली आणि सगळ्यात मोठी समस्या म्हणजे गुणवत्तेचा प्रचंड ऱ्हास आणि त्यामागे शिक्षकांचा असलेला तुटवडा, एका बाजूला हजारो पदे वर्षानुवर्षे रिक्त आहेत आणि दुसऱ्या बाजूला जे शिक्षक कार्यरत आहेत त्यांच्यावर अध्यापनाव्यतिरिक्त इतकी अशैक्षणिक कामे लादली गेली आहेत. ते वर्गात शिकवण्यापेक्षा कार्यालयात आणि निवडणुकीच्या कामातच जास्त गुंतलेले दिसतात. जनगणना, मतदार याद्या दुरुस्ती, मध्यान्ह भोजनाचा हिशेब, शालेय पोषण आहाराच्या धान्याची नोंद, विविध सरकारी डेटा भरणे, यामुळे शिक्षक हा शिक्षक न राहता एक बहुउद्देशीय लिपिक बनला आहे. याचा थेट परिणाम मुलांच्या शिकण्यावर होतो. अनेक शाळांमध्ये दोन शिक्षकांवर पाच वर्गांचा भार आहे, तर काही ठिकाणी एकाच शिक्षकावर संपूर्ण शाळा चालते, अशा परिस्थितीत दर्जेदार शिक्षणाची अपेक्षा करणे हीच एक मोठी चूक ठरते.

**संजय सोनावणे**

दुसरी समस्या आहे ती पायाभूत सुविधांची वानवा, कागदावर प्रत्येक शाळेत शौचालय, पिण्याचे स्वच्छ पाणी, वीज, क्रीडांगण आणि डिजिटल वर्ग दाखवले जातात, पण प्रत्यक्षात गेल्यावर चित्र वेगळेच असते. महाराष्ट्रासह अनेक राज्यांच्या ग्रामीण भागात अजूनही अशा शाळा आहेत जिथे छत गळते, भिंतींना तडे गेले आहेत, मुलांना बसण्यासाठी पुरेसे बेंच नाहीत, शौचालये आहेत, पण पाण्याअभावी वापरात नाहीत, विशेषतः मुलींसाठी स्वतंत्र आणि स्वच्छ स्वच्छतागृह नसल्याने इयत्ता पाचवी-सहावीनंतर मुलींचे गळतीचे प्रमाण प्रचंड वाढते, हे गळतीचे प्रमाण ही तिसरी आणि सर्वात गंभीर समस्या आहे, सरकारी आकडे सांगतात की प्रवेशाचे प्रमाण शंभर टक्के आहे, पण आठवीपर्यंत टिकणाऱ्या मुलांचे प्रमाण निम्म्याहून कमी आहे, कारण गरीब कुटुंबातील मुलांना शाळेत टिकवून ठेवण्यासाठी केवळ मोफत पुस्तके आणि गणवेश पुरेसा नाही, तर शिक्षणातून भविष्य घडेल याची खात्री पालकांना वाटावी लागते, पण जेव्हा पालक पाहतो की त्याचा मुलगा पाचवीत असूनही नीट वाचू शकत नाही, साधे बेरीज वजाबाकी करू शकत नाही, तेव्हा तो त्याला शाळेतून काढून शेतात किंवा रोजंदारीवर घेऊन जातो, याला कारणीभूत आहे ती शिक्षण पद्धतीची आणि अभ्यासक्रमाची बाजाराशी आणि जगाशी तुटलेली नाळ. आजही आपण २० वर्षांपूर्वीचेच धडे त्याच पद्धतीने शिकवतो, इंग्रजी, विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयांमध्ये सरकारी शाळेचा विद्यार्थी खासगी शाळेच्या तुलनेत खूप मागे पडतो, कारण त्याला कधीच प्रयोगशाळा दिसली नाही, संगणकावर हात लावायला मिळाला नाही, डिजिटल शिक्षण हे फक्त शहरातील काही मॉडेल स्कूलपुरते मर्यादित राहिले आहे, कोरोना काळात ही दरी आणखी रुंदावली, जेव्हा ऑनलाईन शिक्षण सुरू झाले तेव्हा सरकारी शाळेतील नव्वद टक्के मुलांकडे मोबाईल किंवा इंटरनेटच नव्हते, त्यामुळे दोन वर्षे त्यांचे शिक्षण पूर्णपणे ठप्प झाले आणि त्याची भरपाई आजपर्यंत झालेली नाही, चौथी गंभीर समस्या म्हणजे प्रशासनाचा आणि समाजाचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन. सरकारी शाळा म्हणजे गरीबांची शाळा हा शिक्का इतका घट्ट बसला आहे की, मध्यमवर्गीय कुटुंबाने चुकूनही आपल्या मुलाला तिथे घालू नये, अशी मानसिकता तयार झाली आहे, यामुळे शाळा आणि समाज यांच्यातील नाते तुटले आहे, पूर्वी गावची शाळा ही गावच्या अभिमानाची गोष्ट असायची. ग्रामपंचायत, पालक आणि शिक्षक मिळून शाळा चालवायचे, आता शाळा व्यवस्थापन समित्या केवळ कागदावर आहेत. त्यांना कोणतेही अधिकार नाहीत आणि त्यांना विश्वासातही घेतले जात नाही. परिणामी शाळेवर कोणाचेही सामाजिक नियंत्रण उरलेले नाही, शिक्षकांना कोणी जाब विचारत नाही आणि प्रशासनाला शाळेची खरी परिस्थिती कळत नाही, याचाच फायदा घेऊन अनेक ठिकाणी भ्रष्टाचार बोकाळला आहे, शालेय पोषण आहार, गणवेश वाटप, शिष्यवृत्ती यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होतात, पण त्यावर कारवाई होत नाही. कारण यंत्रणाच एकमेकांना वाचवते, पाचवी समस्या म्हणजे भाषेची आणि स्थलांतराची, महाराष्ट्रातच मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या झपाट्याने कमी होत आहे. पालकांना वाटते की इंग्रजी माध्यमाशिवाय नोकरी मिळणार नाही, त्यामुळे ते पोटाला चिमटा काढून खासगी इंग्रजी शाळेत मुलांना घालतात, पण तिथेही गुणवत्ता नसते, फक्त इंग्रजीचा बोर्ड असतो, परिणामी मुलगा ना धड मराठीत राहतो ना धड इंग्रजीत, त्याचे नुकसान होते. सरकार दरवर्षी शिक्षणावर बजेट वाढवते असे दाखवते, पण प्रत्यक्षात जीडीपीच्या तुलनेत शिक्षणावरील खर्च अजूनही तीन टक्क्यांपेक्षाही कमी आहे, जो विकसित देशांमध्ये सहा टक्क्यांहून जास्त आहे, पैसा येतो पण तो योग्य ठिकाणी वापरला जात नाही, नवीन इमारती बांधल्या जातात, पण त्यात शिक्षक नेमले जात नाहीत. टॅब वाटले जातात, पण त्यात इंटरनेट नसते, यावर उपाय एकच आहे, तो म्हणजे सरकारी शाळेकडे दानधर्म किंवा गरिबांसाठीची योजना म्हणून न पाहता ती देशाच्या भविष्याची गुंतवणूक म्हणून पाहण्याची गरज आहे.

*-आपलं महानगरवरून साभार.*

## धर्माबाद न.पा.तर्फे सेवानिवृत्त सफाई कामगारांना निरोप;वारसांना नियुक्ती आदेश प्रदान

धर्माबाद/प्रतिनिधी-शहराच्या स्वच्छता आणि आरोग्याची धुरा आयुष्यभर प्रामाणिकपणे सांभाळणाऱ्या धर्माबाद नगर परिषदेच्या आस्थापनेवरील ६ सेवानिवृत्त सफाई कामगारांचा भावपूर्ण निरोप समारंभ नुकताच अत्यंत उत्साहपूर्ण व भावुक वातावरणात पार पडला. केवळ निरोपच दिला नाही, तर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू राहावा यासाठी लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार त्यांच्या ५ वारसांना पालिकेच्या सेवेत थेट नियुक्ती आदेशही सुपूर्द करण्यात आले. या दुहेरी सोहळ्यामुळे निरोप घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रू तर वारसांच्या चेहऱ्यावर रोजगाराचा आनंद पाहायला मिळाला.



धर्माबाद नगरपरिषद कार्यालयात आयोजित या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. संगीता महेश बोलमवाड या होत्या. तर प्रमुख उपस्थितीमध्ये मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे, उपनगराध्यक्ष महेश नारायण बोलमवाड, गटनेते ताहेरखान पठाण यांच्यासह विविध विषय समितीचे सभापती, नगरसेवक, नगर परिषद कर्मचारी आणि सफाई कामगारांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते निवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. दीर्घकाळ पालिकेची सेवा करून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा पालिकेने सन्मानपूर्वक निरोप घेतला बाबू गणपत मिसाळे, रमेश दत्तू भद्रे, शंकर सटवाजी कांबळे, लक्ष्मीबाई गंगाधर मृदंगे, शकुंतलाबाई नामदेव वासनिकर, चंद्राबाई रमेश घाटे या वारसांच्या हाती मुलांच्या नावे नियुक्तीचे आदेश देऊन कुटुंबांना मोठा आधार दिला. आई-वडिलांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या कुटुंबातील पात्र वारसांना तात्काळ सेवेत सामावून घेत नगर परिषदेने सामाजिक बांधिलकी जपली. यामध्ये पुढील तरुण-तरुणींना नियुक्ती पत्रे देण्यात आली. आकाश बाबूराव मिसाळे, दामिनी रमेश भद्रे, अमोल शंकरराव कांबळे, रोहन यशपाल मृदंगे, मारुती नामदेव वासनिकर यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. याप्रसंगी बोलताना पालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी व मुख्याधिकाऱ्यांनी सफाई कामगारांच्या योगदानाचा गौरव केला. शहराला स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यात सफाई कामगारांचे योगदान सर्वात महत्त्वाचे आहे. ऊन, वारा, पाऊस कशाचीही परवा न करता त्यांनी बजावलेले कर्तव्य कौतुकास्पद आहे. त्यांच्या प्रदीर्घ सेवेला मनःपूर्वक सलाम आणि पुढील निरोगी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा, अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले योजनेत ३३ लाभार्थी पात्र

मुखेड/प्रतिनिधी-तालुक्यात सन २०२३ ते जून २०२६ या कालावधीत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील शून्य ते १८ वर्षे वयोगटातील ३३ मुलांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचा लाभ मिळणार आहे. पात्र लाभार्थ्यांना दरमहा २१५० रुपये अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाचे संरक्षण अधिकारी गजानन चौकेकर यांनी दिली.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुलांना अन्न, वस्त्र, निवारा तसेच वैद्यकीय व शैक्षणिक मदत मिळावी, या उद्देशाने शासनाने ३० मे २०२३ पासून या योजनेची सुधारित स्वरूपात अंमलबजावणी सुरू केली आहे. यापूर्वी या योजनेअंतर्गत दरमहा ११०० रुपये अनुदान देण्यात येत होते. आता त्यात वाढ करून दरमहा २१५० रुपये देण्यात येणार आहेत.आई किंवा वडील अथवा दोघांचेही निधन झालेले असल्यास, तसेच आई किंवा वडिलांपैकी एक जण दुर्धर आजाराने ग्रस्त असल्यास संबंधित मुलांना या योजनेचा लाभ मिळू शकतो. याशिवाय घटस्फोटित महिलांच्या शून्य ते १८ वर्षे वयोगटातील बालकांनाही योजनेच्या निकषांनुसार लाभ मिळणार आहे.पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प अधिकारी कार्यालयातील महिला व बालविकास संरक्षण अधिकारी गजानन चौकेकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# एमपीडीए अंतर्गत सराईत गुन्हेगार किशन कुरील स्थानबद्ध

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील गुन्हेगारांविरुध्द कारवाईची पोलीसांनी धडक मोहिम सुरु केली आहे. एमपीडीए अंतर्गत सराईत गुन्हेगार किशन राजू कुरील यास एका वर्षासाठी पोलीसांनी स्थानबध्द केले असून त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात करण्यात आली आहे.

किशन राजू कुरील रा. गायत्री मंदिराजवळ, वजिराबाद, नांदेड याच्या विरुध्द खून, खंडणी, खुनाचा प्रयत्न, अवैधरित्या शस्त्र बाळगणे, जबरी चोरी व अन्य प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. किशन कुरील याच्या विरुध्द पोलीसांनी अनेकवेळा कारवाई करुन त्यास अटकही केली होती. प्रतिबंधात्मक कारवाई करुनही त्याच्या वर्तुवणुकीत सुधारणा झाली नाही. वजिराबाद पोलीस स्टेशनच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांनी किशन कुरील याच्या विरुध्द एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्याकडे सादर केला होता. पोलीस अधीक्षकांनी सदरील प्रस्तावाला मान्यता देवून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दि.२५ ऑगस्ट रोजी किशन कुरील यांच्या विरुध्द एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव मंजूर करुन एका वर्षासाठी स्थानबध्द करण्याचे आदेश दिले होते. पोलीसांनी तात्काळ किशन कुरील यास ताब्यात घेवून त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात करण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाने चालू वर्षात आतापर्यंत एकुण १६ गुन्हेगारांविरुध्द एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. आणखी काही सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्याचे प्रस्तावाची प्रक्रिया सुरु आहे.





# पंधरा वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीस अटक

नांदेड/प्रतिनिधी-स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १५ वर्षापासून गुंगारा देणाऱ्या घरफोडीच्या आरोपीस बीड जिल्ह्यातील केज येथून ताब्यात घेतले आहे. स्थागुशाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद खैरे व त्यांचे पथक गस्त घालत असतांना, गोपनीय बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की तामसा पोलीस ठाण्यातील घरफोडीच्या गुन्ह्यात फरार आरोपी बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात वास्तव्य करत आहे. माहिती मिळताच पथकाने तातडीने केज तालुक्यातील सावळेश्वर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात शोध घेवून एका संशयितास ताब्यात घेतले. पोलीस पथकाने सखोल विचारपूस केली असता, त्याने आपले नाव झुंबर चंदर काळे (वय ६५) रा.सावळेश्वर, ता.केज, जि.बीड) असे सांगितले. आरोपीला विश्वासात घेवून चौकशी केली असता, त्याने २०११ मध्ये नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुका परिसरासह तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी केल्याची कबुली दिली.

# नरोबा मंदिर येथे भक्तांना प्रसादाचे वाटप

नांदेड/प्रतिनिधी-जुना कौठा नांदेड येथील नरोबा देवस्थान मंदिर येथे श्रावणमास निमित्ताने नृसिंह गुप्र युनियन यांच्या वतीने विधीवत पूजन करून महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते यावेळी भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



दरवर्षी प्रमाणे याही वर्षी २६ ऑगस्ट रोजी नरोबा देवस्थान जुना कौठा नांदेड येथे महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते, प्रारंभी सकाळी विधीवत पूजन गुरु व्यंकटेश मुळी यांच्या आचार्य तत्वाने विधीवत पूजन बालाजी मनकुलवार,माधव पावडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी विश्वस्त मंडळ पदाधिकारी विनोद काकडे यांनी गुप्रचे शिवा मळगे, शाम जौधंळे, तुकाराम हंबर्डे,दिपक रूद्रावार, रघुनाथ पावडे, भगवान मंगरूळे, गोविंद, सुनिल तारू, बालाजी दमकोंडवार मुक्तेश्वर, देविमिश्रा, मंगल भालेराव, तिरूपती पाटील, बळी पंदीलवाड, अवधुत सावळे, बाळु कैलासे, राम बोडके, विनायक प्रभूज यांच्या सत्कार केला.

# मनपा कर्मचाऱ्यांना थकीत महागाई भत्ता,सातव्या वेतन आयोगाचा एकूण ६६.४९ लाखांचा पहिला हप्ता वाटप

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत, आगामी रक्षाबंधन आणि ईद-ए-मिलाद या सणांच्या पूर्वसंध्येला कर्मचाऱ्यांच्या थकीत महागाई भत्त्याची आणि सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात वर्ग केली आहे. महानगर पालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार योग्य नियोजन करून पहिल्या टप्प्यात एकूण रु. ६६.४९ लक्ष इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

महानगरपालिकेचे कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांचे माहे जानेवारी २०२२ ते ऑगस्ट २०२५ पर्यंतचे थकीत महागाई भत्ता ३४ टक्के वरून ५५ टक्के पर्यंतची एकूण रु. ९.७४ कोटी तसेच कार्यरत कर्मचाऱ्यांची ४.०५ कोटी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची २.६८ कोटी रक्कम देय आहे. मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी घेतलेल्या निर्णयानुसार ही सर्व थकीत रक्कम एकूण २४ हप्त्यांमध्ये अदा करण्यास मान्यता दिली आहे. त्यापैकी पहिला हप्ता म्हणून कार्यरत कर्मचाऱ्यांचे रु.२९.८१ लक्ष व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे रु. १४.१५ लक्ष असे एकूण रु. ४३.९६ लक्ष रुपये मंगळवारी अदा करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे माहे जानेवारी २०२६ ते एप्रिल २०२६ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम अदा करणे आवश्यक होते. त्यानुसार या आवश्यक रकमेचा पहिला हप्ता म्हणून रुपये २२.५३ लक्ष सुद्धा यशस्वीरित्या अदा करण्यात आला आहे. महानगरपालिकेची सातव्या वेतन आयोगाची थकीत रक्कम न्यायालयीन प्रकरणातील सर्व कर्मचाऱ्यांना एकूण पाच हप्त्यांमध्ये पूर्णपणे अदा करण्यात आली आहे. तसेच, उर्वरित (न्यायालयाव्यतिरिक्त) कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाच्या पाच हप्त्यांपैकी ३ हप्ते आतापर्यंत अदा करण्यात आले असून, उर्वरित २ हप्ते देणे शिल्लक आहेत. महानगरपालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या थकीत रक्कमेबाबत महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार टप्प्याटप्प्याने नियोजन करून रक्कमा अदा करण्याचे योग्य नियोजन मनपा प्रशासनाकडून केले जात असल्याची माहिती यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे यांनी दिली आहे. ऐन सणांच्या तोंडावर बँक खात्यात रक्कम जमा झाल्याचे संदेश मिळताच कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मनपा कर्मचाऱ्यांनी हा आर्थिक दिलासा दिल्याबद्दल मनपा आयुक्तांचे व प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# नरसी-राहेर कावड यात्रेला शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



नायगाव/प्रतिनिधी-श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरातून कावड यात्रेला भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली. कावड यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांनी पहाटे ३ वाजता वाहनाने राहेर येथे दाखल होत गोदावरी नदीत स्नान केले. त्यानंतर गोदावरी नदीचे पवित्र गंगाजल कावडीत घेऊन भाविकांनी राहेर ते नरसी असा पायी प्रवास केला.

पायी कावड यात्रा नरसी येथील श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात पोहोचल्यानंतर भाविकांनी पवित्र गंगाजलाने भगवान महादेवाचा जलाभिषेक केला. यावेळी हर हर महादेवच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला. यात्रेदरम्यान मार्गावरील विविध ठिकाणी भाविकांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. तसेच जागोजागी विविध मान्यवर व ग्रामस्थांच्या वतीने भाविकांसाठी पिण्याचे पाणी, अल्पोपहार व इतर आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. दरम्यान, नरसी येथील श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात कावड यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन भाजपा नेते श्रावण पा. भिलवंडे यांच्या वतीने करण्यात आले. महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. कावड यात्रेमुळे नरसी परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. मोठ्या उत्साहात पार पडलेल्या या कावड यात्रेत शिवभक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



लोहा : जुन्या लोहा शहरातील नदीवर बांधण्यात आलेल्या पुलाची संरक्षण भिंत पाडून प्लॉटींगसाठी रस्ता तयार करण्यात आला आहे. त्यामुळे नदीला आलेल्या पुराचे पाणी नागरिकांच्या घरात शिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. (छाया : विनोद महाबळे)

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष पी.ए.खंडारे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२८४/२०२६
जोहोरोनिसा व इतर वि.निरंक

अर्जदार : १. जोहोनिसा मोहम्मद जफर, वय : ७१ वर्षे धंदा : घरकाम, रा.प्लॉट क्र.११०, महेर बाग कलाम चौक, न्यु.हस्सापूर वाघी रोड, नांदेड, २. शेख रहिमुन्नीसा बेगम भ्र.मोहम्मद मुस्तफा, वय : ६१ वर्षे धंदा : घरकाम, रा.जाधव गॅस एजन्सी जवळ, सरफराज नगर, परभणी, ३. मोहम्मद तयब पि.मोहम्मद अब्बास, वय : ६१ वर्षे धंदा : सेवानिवृत्त, रा.प्लॉट नं.५, हस्सापूर, नांदेड, ४. नुरजहा पि.मोहम्मद अब्बास, वय : ५८ वर्षे धंदा : घरकाम, रा. पोलीस हेड क्वॉर्टर, नांदेड, ५. शेख शमा पि.अब्बास अली, वय : ५१ वर्षे धंदा : घरकाम, रा.८-१-२८८, नगर गल्ली किल्ला रोड, नांदेड, ६. नसिमा पि.अब्बासअली, वय : ५६ वर्षे धंदा : घरकाम, रा.पोलीस हेड क्वॉर्टर, वजीराबाद,नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत मोहम्मद अब्बास अली पि.मोहम्मद बुरानोदीन यांचे वारस आहेत. मयत मोहम्मद अब्बास अली पि.मोहम्मद बुरानोदीन यांचा दिनांक ०८/०३/२००८ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केले आहे. अर्जदार क्र.१,२,४ ते ६ या मयताच्या मुली व अर्जदार क्र.३ हा मयताचा मुलगा आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक ०९/१०/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २५/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्याने दिला.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | ''आदेशावरुन'' |
| **कनिष्ठ लिपीक** | स्वाक्षरित/- |
| ५ वे सह दिवाणी न्यायालय | **सहा.अधिक्षक** |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

# धर्माबाद-पंढरपूर बस प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद ते पंढरपूर दरम्यान नियमित धावणाऱ्या एसटी बसच्या टायरची अवस्था अत्यंत खराब झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दररोज सुमारे चारशे किलोमीटरचा प्रवास करणाऱ्या या बसच्या टायरवर मोठ्या प्रमाणात झीज झाल्याचे तसेच ठिकठिकाणी भेगा पडल्याचे दिसून येत आहे.



लांब पल्लूयाच्या मार्गावर धावणाऱ्या बससाठी टायरची स्थिती अत्यंत महत्त्वाची असते. मात्र, संबंधित बसच्या टायरची झालेली झीज पाहता प्रवासादरम्यान टायर पंक्चर होणे किंवा अन्य तांत्रिक बिघाड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षितेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. धर्माबाद-पंढरपूर ही बससेवा अनेक प्रवाशांसाठी महत्त्वाची आहे. दररोज मोठ्या अंतराचा प्रवास करणाऱ्या या बसची नियमित तांत्रिक तपासणी होणे अपेक्षित आहे. मात्र, खराब अवस्थेतील टायरसह बस मार्गावर धावत असल्याने एसटी प्रशासनाच्या देखभाल व्यवस्थेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. प्रवाशांनी संबंधित एसटी प्रशासनाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन बसची सखोल तपासणी करावी, जीर्ण व भेगा पडलेले टायर त्वरित बदलावे आणि बस पूर्णपणे सुरक्षित असल्याची खात्री झाल्यानंतरच ती मार्गावर सोडावी, अशी मागणी केली आहे. प्रवाशांची सुरक्षितता ही सर्वांत महत्त्वाची असून, संभाव्य दुर्घटना घडण्याची वाट न पाहता एसटी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

# जिल्हा माहिती कार्यालयातील उपसंपादकपदी चंद्रकांत कारभारी रुजू

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा माहिती कार्यालय नांदेड येथील उपसंपादकपदावर चंद्रकांत कारभारी आज रुजू झाले. हिंगोली येथून बदलीने त्यांची नांदेड येथे नियुक्ती झाली आहे. प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे यांनी त्यांचे स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने जारी केलेल्या आदेशानुसार, यापूर्वी या पदावर कार्यरत असलेल्या उपसंपादक अलका पाटील यांची हिंगोली येथे बदली झाली आहे.चंद्रकांत कारभारी हे यापूर्वी जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली येथे उपसंपादक म्हणून कार्यरत होते. तेथे त्यांनी राज्य शासनाच्या विविध योजना, उपक्रम तसेच विकासकामांच्या प्रसिद्धीचे काम प्रभावीपणे पार पाडले. नांदेड येथे रुजू झाल्यानंतर जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

# मानव विकास योजनेतर्गत विद्यार्थिनींना सायकलीचे वाटप

देगलूर/प्रतिनिधी-मानव विकास योजनेतर्गत इयत्ता ८ वी ते १० वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या ६४ विद्यार्थिनींना शाळेत ये-जा करण्यासाठी सायकलीचे वाटप करण्यात आले. साधना विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे शहरातील आर्थिक दुर्बल मागासवर्गीय विद्यार्थिनींना शिक्षणासाठी मोठी प्रेरणा मिळणार असून, त्यांच्या शाळेतील नियमित उपस्थितीलाही चालना मिळणार आहे.

ग्रामीण व दुर्गम भागातील मुलींना शिक्षण घेताना प्रवासाची अडचण निर्माण होऊ नये आणि आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणात अडथळे येऊ नयेत, या उद्देशाने शासनाच्या मानव विकास योजनेंतर्गत सायकल वाटप करण्यात येते. त्याच अनुषंगाने साधना शाळेतील ६४ पात्र विद्यार्थिनीची निवड करून त्यांना सायकली प्रदान करण्यात आल्या. यामध्ये आर्थिक दुर्बल घटकातील विविध मागास प्रवर्गातील विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक वाय. एस. बत्तुरार होते. यावेळी उपमुख्याध्यापक बी. एन. सुगांवकर, पर्यवेक्षक बी. डी. गोणे मान्यवर शिक्षक, शिक्षिका आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थिनीना सायकलींचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींनी शिक्षणाच्या संधीचा पुरेपूर लाभ घेऊन आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी, असे आवाहन करण्यात आले.

# डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रत्येक प्रभागात फवारणी करा:अनुपमा गायकवाड

बिलोली/प्रतिनिधी-बिलोली शहरातील विविध प्रभागांमध्ये डासांचा प्रादुर्भाव वाढला असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पावसामुळे ठिकठिकाणी साचलेले पाणी, नाल्या व गटारींमधील अस्वच्छता यामुळे डासांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहरातील प्रत्येक प्रभागात तातडीने फॉगिंग व डास प्रतिबंधक औषधांची फवारणी करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका सौ. अनुपमा महेंद्र गायकवाड यांनी मुख्याधिकारी कल्पेश जाधव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

डासांमुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संभाव्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नगर परिषदेच्या फॉगिंग मशीनद्वारे प्रत्येक प्रभागात नियमित धूर फवारणी करण्यात यावी. तसेच नाल्या, गटारी, साचलेले पाणी आणि डासांची उत्पत्ती होणाऱ्या ठिकाणी स्वच्छता करून आवश्यक ती औषध फवारणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# नगराध्यक्षा रोहिणी वानखेडे यांना खासदार समर्थक नगरसेवकांची साथ



हदगाव/प्रतिनिधी-खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश केल्यानंतर हदगाव शहराच्या स्थानिक राजकारणातही नव्या राजकीय समीकरणांना सुरुवात झाल्याचे चित्र दिसून येत आहे. खा. आष्टीकर यांच्या समर्थक नगरसेवकांची साथ शिवसेना (शिंदे) गटाला अप्रत्यक्ष मिळाल्याने हदगाव नगरपरिषदेच्या राजकारणात शिंदे गटाची ताकद वाढली असून, नगराध्यक्षा रोहिणी भास्कर वानखेडे यांची नगरपरिषद सभागृहातील बाजू अधिकच भक्कम झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

हदगाव नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा रोहिणी वानखेडे या शिवसेना (शिंदे) गटाच्या असून त्या माजी खा.सुभाष वानखेडे यांच्या स्नुषा आहेत. खा.नागेश पाटील आष्टीकर यांच्यासोबत असलेले स्थानिक राजकीय मतभेद आता हळूहळू दूर होत असल्याचे अलीकडील घडामोडींवरून दिसून येत आहे. विशेष म्हणजे, दोन दिवसांपूर्वी हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी माजी खा.सुभाष वानखेडे यांचे युवा चिरंजीव भास्कर सुभाष वानखेडे व इतर नगरसेवकां समवेत सत्कार करून सन्मान केला. या भेटीमुळे वानखेडे-आष्टीकर यांच्यातील राजकीय दुरावा कमी होत असल्याचे संकेत मिळाल्याची संकेत मिळत आहे. खा.आष्टीकर समर्थक नगरसेवकांची साथ आणि शिवसेना (शिंदे) गटाची वाढलेली ताकद यामुळे हदगाव नगरपरिषदेत विकासकामांना चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था तसेच इतर नागरी प्रश्न मार्गी लावण्यासाठी खासदारांच्या माध्यमातून शासनस्तरावर पाठपुरावा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात हदगाव नागरी विकासाला नवी दिशा मिळणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.खा. नागेश पाटील आष्टीकर यांची भेट घेण्याचा योग आला आहे. त्यांनी माझा सत्कार करून सन्मान केला. आगामी काळात हदगाव शहराच्या नागरी विकासासाठी मोठ्या प्रमाणात कामे करण्यात येतील, असा शब्द विद्यमान खासदारांनी दिला आहे. त्यांच्या या आश्वासनामुळे हदगावच्या शहर विकासाला निश्चितच नवी दिशा मिळेल, असा विश्वास आहे, असे भास्कर सुभाष वानखेडे यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# मुंबई-अहमदाबाद वंदे भारत एक्स्प्रेसवर दगडफेक

मुंबई/प्रतिनिधी-मुंबईहून आहमदाबादला जाणाऱ्या वंदे भारत ट्रेनवर दगडफेक्र झाल्याचे वृत्त आहे. या ट्रेनमधून राजकीय व्यक्ती प्रवास करत असल्याचेही समोर आले आहे. अशा प्रकारे दगडफेक्र झाल्याने सुरक्षेविषयी चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबईहून अहमदाबादला जाणाऱ्या वंदे भारत ट्रेन एका अज्ञात व्यक्तीने दगडफेक्र केली असल्याची माहिती समोर येतेय. या ट्रेनमधून गुजरातच्या माजी मुख्यमंत्री आणि उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि दादरा-नगर हवेलीचे प्रशासक प्रफुल्ल पटेल प्रवास करत होते. परंतु, एक्झिक्युटिव्ह कोचमधून प्रवास करत असल्याने ते सुरक्षित राहिले. सुरत सोडल्यानंतर वंदे भारत ट्रेनवर दगडफेक्र झाल्याची घटना घडल्याचे सांगितले जात आहे. मुंबई-अहमदाबाद वंदे भारत एक्सप्रेसवर सायंकाळी साडेसहाच्या दरम्यान उत्तराण आणि कोसड दरम्यान दगडफेक्रीची घटना घडली. या घटनेची माहिती एसपी/जीआरपी यांना देण्यात आली,त्यानंतर आयपीएफ / अंकलेश्वर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी एका संशयिताला अटक केली.




दिवंगत खा.वसंतराव चव्हाण यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस खा.प्रा.रवींद्र चव्हाण यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी माजी आ.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबन बारसे, सुनील कदम यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस)

## खंजर बाळगणाऱ्या इसमास अटक

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील डॉ.शंकरराव चव्हाण चौक परिसरातील ब्रीजखाली खंजर घेवून फिरणाऱ्या एका इसमास पोलीसांनी अटक केली आहे.

हरदयालसिंघ मंगलसिंघ जुनी (वय २०) रा. गोकुळनगर, नांदेड हा इसम हातात खंजर घेवून एखादा गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत असतांना विमानतळ पोलीस स्टेशनच्या बस्तीवरील पथकाने कामठा भागातील डॉ.शंकरराव चव्हाण चौक परिसरातील ब्रीज जवळ अटक केली.

# ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त डीजेमुक्त मिरवणूक ठरली आदर्श



उमरखेड/प्रतिनिधी-इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त ईद-ए-मिलादुन्नबीचा उत्सव शहरात मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि शांततापूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ईद-ए-मिलाद उत्सव समितीच्या वतीने काढण्यात आलेली यंदाची भव्य मिरवणूक डीजेमुक्त असल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सकाळी ९ वाजता हजरत तातार शाह बाबा दर्गा येथून मिरवणुकीला प्रारंभ झाला. विविध मस्जिद कमिटीचे पदाधिकारी, मौलवी, उत्सव समितीचे पदाधिकारी आणि आबालवृद्ध मुस्लिम बांधव हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. शिस्तबद्ध पद्धतीने ही मिरवणूक आठवडी बाजार, शिवाजी वॉर्ड, नाग चौक, संजय गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा गांधी चौक, सुवर्णपथक मार्ग आदी प्रमुख मार्गावरून गेली. मार्गावर विविध सामाजिक संघटना आणि नागरिकांच्या वतीने पाणी व फराळाची व्यवस्था करण्यात आली होती, तर काही ठिकाणी रक्तदान शिबिराचेही आयोजन करून धार्मिक सणाला सामाजिक बांधिलकीची जोड देण्यात आली. डीजेचा वापर पूर्णपणे टाळून ध्वनी प्रदूषणमुक्त मिरवणूक काढण्यात आली. मागील वर्षीच्या सिरफ कमिटी व यंदाच्या उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे धार्मिक भावना जपत शांतता, शिस्त आणि बंधुभावाचा आदर्श उमरखेड शहराने घालून दिला. या पार्श्वभूमीवर उमरखेड पोलिसांनीही चोख बंदोबस्त ठेवला होता.

# पुसद रोडवरील बँक परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा गायब

उमरखेड/प्रतिनिधी-जिल्हा नियोजन समितीच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीतून उमरखेड शहरात सीसीटीव्हीचे सुरक्षाकवच उभारले गेले. शहर सुरक्षित झाल्याचा दावा होत असताना, याच शहरातील सर्वात संवेदनशील आणि गजबजलेल्या पुसद रोडवर संरक्षणात्मक दृष्ट्या महत्त्वाचे असणाऱ्या शासकीय कॅमेऱ्यांची नजरच नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. त्यामुळे प्रशासन या 'अंधारलेल्या लक्ष्मीच्या दारात' शासन आपला तिसरा डोळा कधी लावणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शहरातील सर्वात संवेदनशील आणि गजबजलेल्या या रोडवर सर्व प्रमुख बँका जसे की स्टेट बँक, सेंट्रल बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, पुसद अर्बन, जिजाऊ बँक, विदर्भ कोकण ग्रामीण बँक, बुलढाणा अर्बन सह अनेक बँका, एटीएम सह अनेक शाळा आणि ग्राहक केंद्रांची मोठी गर्दी याच पुसद रोडवर आहे. शालेय विद्यार्थ्यांसह पैशाच्या महत्त्वपूर्ण व्यवहारासाठी दिवसभर मोठी रहदारी याच रोडवर दिसून येते. मध्यंतरी याच परिसरातील एटीएम मधील फसवणुकीच्या घटना याच रोडवर घडल्या, त्यातील आरोपी आजही दृष्टीपटात आलेले नाहीत. एवढ्या संवेदनशील ठिकाणीच शासकीय सीसीटीव्ही नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. एखादी चोरी किंवा फसवणुकीची घटना घडल्यावर पोलिसांसाठी सीसीटीव्ही फुटेज हा सर्वात मोठा पुरावा असतो. पण येथे शासकीय यंत्रणाच गायब असल्याने पोलिसांना बँकांच्या किंवा खासगी दुकानांच्या कॅमेऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. अनेकदा त्या कॅमेऱ्यांची दिशा चुकीची असते, फुटेज मिळत नाही आणि तपासात अडथळा येतो. त्यामुळे आजच असा प्रश्न उपस्थित होतो की कोट्यवधी खर्च केले मग बँक परिसर वगळलाच कसा? उमरखेड शहरात कोट्यवधी रुपये खर्चून सीसीटीव्ही प्रकल्प राबवला, पण जिथे अत्यंत गरज आहे, तिथेच कॅमेरे नाहीत, ही विसंगती का?, असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून आता तरी प्रशासन या 'अंधारलेल्या लक्ष्मीच्या दारात' आपला तिसरा डोळा लावेल का?, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून,ज्या रस्त्यावर पैशाच्या व्यवहाराला सुरक्षा नाही आणि लेकरांच्या जीवाला पहारा नाही, चौकात गजरे लावण्यापेक्षा अशा ठिकाणी नजर हवी. असे म्हणण्यास वावगे ठरू नये. याबाबत भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी 'नांदेड वार्ता'शी बोलताना म्हणाले की, शहरात सीसीटीव्ही यंत्रणा मोठ्या प्रमाणात कार्यान्वित झाली आहे. हे खरे आहे. मात्र बँक परिसरात व्यवस्था नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी पुसद रोड परिसरात तात्काळ सीसीटीव्ही उभारू. जिल्हा नियोजनच्या बैठकीत तातडीने प्रस्ताव सादर करुन मंजुरी घेण्यात येईल.

# गुरुकुल विद्यालय धर्माबाद येथे संस्कृत दिन उत्साहात साजरा

धर्माबाद/प्रतिनिधी-२४ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट दरम्यान संस्कृत सप्ताह साजरा करावा असे शासनाचे परीपत्रक आहे, यानुसार धर्माबाद येथील गुरुकुल विद्यालयात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे मार्गदर्शन संचालक पी.एल.गोपतवाड प्रमुख पाहुणे म्हणून जय किसान विद्यालय कोल्हेबोरगावचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक एच.बी.गोपछडे तसेच राजर्षी शाहू सैनिकी विद्यालय सगरोळी येथील संस्कृतविभाग प्रमुख व्ही.एम.महाजन हे होते.

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीपूजनाने झाली. विद्यार्थ्यांनी तयार केलेले चित्रपद कोष प्रदर्शनीचे औपचारीक उदघाटन गोपछडे एच बी यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी बनवलेले विविध प्रकल्प ठेवण्यात आले होते. संस्कृत ओलंपियाड या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी संस्कृत मध्ये लोकगीत, पोवाडा, श्लोक व अर्थ,इतर गीत कथाकथन, पुस्तक परिचय विविध कौशल्य सादर केले.

# बामणी बसस्थानक परिसरात अवैध दारु विक्री;५६ हजारांचा मुद्देमाल जप्त

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मौजे बामणी, ता. धर्माबाद येथील बसस्थानक परिसरात मोटारसायकलवरून अवैधरीत्या देशी व विदेशी दारूची चोरटी विक्री करणाऱ्या इसमास पोलिसांनी ताब्यात घेतले. या कारवाईत मोटारसायकलसह एकूण ५६ हजार ४१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दि. २५ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास बामणी बसस्थानक परिसरात साईनाथ पोशट्टी जिंकलोर (वय ३५, रा. बामणी, ता. धर्माबाद) हा अवैधरीत्या दारूची विक्री करताना पोलिसांना आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेत त्याच्याकडील हिरो होंडा कंपनीची मोटारसायकल (अंदाजे किंमत ५० हजार रुपये) जप्त केली. तसेच त्याच्याकडे देशी दारू भिंगरी संत्राच्या एकूण ५२ बाटल्या, किंमत ४ हजार १६० रुपये, तर मोटारसायकलच्या डिकीमध्ये २ हजार २५० रुपये किमतीच्या विदेशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या. मोटारसायकल व दारूसह एकूण ५६ हजार ४१० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.या प्रकरणी कुंडलवाडी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक फौजदार माधव पाटील करीत आहेत. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, अपर पोलिस अधीक्षक, भोकर अर्चना पाटील आणि उपविभागीय पोलिस अधिकारी दशरथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.कारवाईच्या पथकात सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोलिस कॉन्स्टेबल शिवराज गंगुलवार, डाकेवाड, प्रकाश शेटीवार, विष्णुकांत नागरगोजे, हर्षवर्धन जाधव, अण्णाराव जाधव तसेच होमगार्ड सुनील रामपुरे यांचा समावेश होता.

# शांताबाई वाठोरे यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-जेतवनगर, येथील रहिवासी तथा जेष्ठ नागरिक शांताबाई निवृत्तीराव वाठोरे (वय ६८) यांचे बुधवार दि.२६ ऑगस्ट रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, तीन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. डॉ. प्रमोद वाठोरे यांच्या त्या मातोश्री व डॉ. विजय कांबळे यांच्या सासूबाई, तर फिनिक्स हॉस्पिटलचे डॉ. अनंत सूर्यवंशी व मिलिंद सूर्यवंशी यांच्या त्या जेष्ठ भगिनी होत्या.



पान १ वरुन

## तिबेटमधून आलेल्या महापुराने...

प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. त्रिशूली नदी पुढे नारायणी नदीला मिळते. भारतात प्रवेश केल्यानंतर याच नदीला गंडक नदी म्हणून ओळखले जाते. त्यामुळे नेपाळमधील या पुराच्या पार्श्वभूमीवर भारतातील गंडक नदीकाठच्या भागातील परिस्थितीवरही लक्ष ठेवणे महत्त्वाचे ठरणार आहे. पूरग्रस्त भागातील संभाव्य धोका लक्षात घेऊन काठमांडू खोरे वाहतूक पोलिसांनी काठमांडूहून रासुवा, नुवाकोट, चितवन आणि धाडिंगकडे जाणारी वाहतूक रोखली आहे. या जिल्ह्यांकडे जाणारी वाहने काठमांडूमध्येच थांबवण्यात येत असल्याची माहिती काठमांडू खोरे वाहतूक पोलीस कार्यालयाचे पोलीस अधीक्षक नरेशराज सुबेदी यांनी दिली. पूरग्रस्त भागातील नागरिकांना मदत आणि बचावकार्य वेगाने करण्यासाठी नेपाळी लष्कराची दोन हेलिकॉप्टर्स रासुवा येथे रवाना करण्यात आली आहेत. नेपाळी लष्कराचे प्रवक्ते ब्रिगेडियर जनरल राजाराम बस्नेत यांनी दोन्ही हेलिकॉप्टर्स बाधित भागात पाठवण्यात आल्याची माहिती दिली.

## प्रलंबित देयकांच्या तणावातून...

आर्थिक संकटातून दिलासा मिळू शकतो. त्यामुळे प्रलंबित देयकांचा तातडीने निपटारा करून संबंधित कुटुंबाला न्याय द्यावा, अशी मागणी ठेकेदार वर्गातून होत आहे. गजानन देवकत्ते हे धनगर समाजातील होतकरू कार्यकर्ते होते. त्यांच्या आत्महत्येबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## एमपीएससीच्या औषध निरीक्षक पेपरफुटी...

आयोगाने संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणात एमपीएससीचे अवर सचिव अभिजीत लेंडवे, सहाय्यक कक्ष अधिकारी गोपाळ मराठे आणि विश्वेश्वर नकाते, तसेच परीक्षार्थी ऋतुजा पाटीलचे वडील अमृत पाटील आणि कथित सूत्रधार प्रवीण पाटील यांच्यासह सहा जणांना अटक करण्यात आली आहे. प्रश्नपत्रिका आयोगाच्या यंत्रणेतून नेमकी कशी बाहेर पडली, ती कोणाच्या माध्यमातून उमेदवारांपर्यंत पोहोचली आणि त्याचा लाभ किती जणांना मिळाला, याचा तपास गुन्हे शाखेकडून सुरू आहे. एमपीएससीतील अधिकाऱ्यांचा सहभाग उघड झाल्याने प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढले असून, तपासातून पेपरफुटीची संपूर्ण साखळी उघड होण्याची शक्यता आहे. भरती प्रक्रिया रद्द झाल्याने हजारो उमेदवारांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, नव्याने परीक्षा कधी घेतली जाणार, याकडे उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४